ग्रंथमालिका ‘बालसंस्कार’ : खंड ५

# टी.व्ही., मोबाईल आणि इंटरनेट यांचे तोटे टाळून लाभ मिळवा !

मराठी (Marathi)

**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले

आणि पू. संदीप गजानन आळशी

**सनातन संस्था**


卐 **सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या** 卐

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९७, गुजराती ७०, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २५, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**फेब्रुवारी २०२५ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९९ लाख १० सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना (२२ मार्च १९९९)

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून ३.२.२०२५ पर्यंत १३० साधक संत झाले, तर १,०४९ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल

३. देवता, साधना, राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती (वर्ष १९९५ पासून आरंभ)

४. हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक (२८ एप्रिल १९९८ ते १९ एप्रिल २००० पर्यंत)

५. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन !

७. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ ‘भारत गौरव पुरस्कार’ देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

(संपूर्ण परिचयासाठी वाचा – **www.Sanatan.org**)

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी !

सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ या सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत. जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति’ या उपाधीने संबोधले जात आहे.

F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

# पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.


---

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी 'प.पू.' किंवा 'परात्पर गुरु' अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

## ग्रंथ वाचण्यास आरंभ करण्यापूर्वी पुढील प्रार्थना करा !

हे कुलदेवते (स्वतःच्या कुलदेवतेचे नाव घ्यावे), उपास्यदेवते (स्वतःच्या उपास्यदेवतेचे नाव घ्यावे) आणि गुरुदेवा (गुरु असल्यास), आपल्या कृपेने या ग्रंथातील विषय मला नीट समजू दे अन् त्यानुसार मला योग्य आचरणही करता येऊ दे.



# अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


**१. दूरचित्रवाणी (टी.व्ही.) १०**

१ अ. 'दूरचित्रवाणी-संच' तुमचा मित्र कि शत्रू ? १०

१ उ. अनावश्यक दूरचित्रवाणी पहाण्याची सवय कशी मोडावी २५

१ ऊ. दूरचित्रवाणीचा हितकारी वापर कसा करावा ? २७

**२. भ्रमणभाष (मोबाईल) ३५**

२ इ. मुलांनो, भ्रमणभाषचा सदुपयोग कसा कराल ? ३६

२ उ. भ्रमणभाषचा संकेतध्वनी (रिंग टोन) सात्त्विक ठेवा ! ४०

**३. माहिती महाजाल (इंटरनेट) ४०**

३ ऊ. अनावश्यक इंटरनेट वापरण्याची सवय कशी मोडावी ? ४८

३ ए. इंटरनेटचा सदुपयोग करून राष्ट्र आणि धर्म प्रेमी बना ! ४८

**४. व्हीडीओ गेम्स ५१**

४ ई. व्हीडीओ गेम्सची सवय मोडण्यासाठी काय करावे ? ५५

**५. कुसंस्कारांपासून वाचण्यासाठी आणि जीवन आनंदी बनवण्यासाठी हे उपायही करा ! ५५**

५ अ. मनाला स्वयंसूचना द्या ! ५५

५ आ. 'साधना' करण्याची गोडी लावून घ्या ! ५९

५ इ. साधनेला आताच आरंभ करा ! ६४

**६. मुलांनो, या ग्रंथातील ज्ञान अनेकांपर्यंत पोहोचवा ! ६४**

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ६६**

# मनोगत

स्वातंत्र्यपूर्व काळातील एक घटना. लो. टिळकांच्या 'केसरी' या वृत्तपत्रामध्ये वृत्त आले, 'आद्यक्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांचे इंग्रज सरकारने कारागृहात इतके हाल केले की, त्यांचे जीवनच संपले !' दामोदर, बाळकृष्ण आणि वासुदेव चापेकर या मुलांनी ते वृत्त वाचले. 'हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी आता इंग्रजांविरुद्ध लढायचे', असा त्यांनी निश्चय केला आणि त्याप्रमाणे करून दाखवले. त्या काळात वृत्तपत्र हेच प्रसारमाध्यम होते. आता वृत्तपत्रांसह दूरचित्रवाहिनी हेसुद्धा एक प्रमुख प्रसारमाध्यम झाले आहे. प्रसारमाध्यम हे मानवी मन घडवण्यामागे महत्त्वाची भूमिका बजावते. वर्तमानपत्रातील एक वृत्त वाचून जर तीन बालके क्रांतीकारक होतात, तर आज प्रतिदिन जी बालके दूरचित्रवाहिन्यांवर प्रेमकथा, बलात्कार, अश्लील दृश्ये आणि हिंसाचार पहातात, ती भविष्यात कोण बनतील ?

दूरचित्रवाहिन्यांमुळे चित्रपट-कलाकार, क्रिकेटपटू यांसारखे चुकीचे आदर्श मुलांसमोर उभे रहातात. त्यामुळे समर्थ रामदासस्वामी, स्वामी विवेकानंद आदी धर्मपुरुष आणि छत्रपती शिवाजी महाराज, लो. टिळक आदी राष्ट्रपुरुष यांसम खऱ्या आदर्शांकडे मुलांचे दुर्लक्ष होते. सध्या दूरचित्रवाहिनी हे मनोरंजनाचे साधन राहिलेले नाही, तर नीतीमत्ता, भारतीय संस्कृती व राष्ट्रीय आदर्श नष्ट करण्याचे ते माध्यम बनले आहे !

आज 'मोबाईल' हा 'आवश्यकता' म्हणून वापरला जाण्यापेक्षा 'फॅशन' म्हणून अधिक वापरला जातो ! दुसऱ्यांकडे 'टच स्क्रीन' मोबाईल आला की, मुलांना वाटते आपल्याकडेही तो हवा ! मद्य आणि सिगारेट ही व्यसने आहेत; कारण ती शरीरघातक आहेत. 'इंटरनेट'वरून अश्लील छायाचित्रे 'डाऊनलोड' करणाऱ्या आणि संगणकावर तासन्तास 'टेरर गेम्स' खेळणाऱ्या मुलांची नीती भ्रष्ट होते,

मनोवृत्ती विध्वंसक बनते आणि विचारक्षमता कुंठित होते. मग इंटरनेट आणि व्हीडीओ गेम्स हीसुद्धा मनोघातक व्यसनेच नव्हेत का ?

मुलांनो, आधुनिक विज्ञानाने दूरचित्रवाणी, व्हीडीओ गेम्स आदींचा शोध सुखाच्या प्राप्तीसाठी लावला. आपले प्राचीन ऋषीमुनीही वैज्ञानिक होते. गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत, आकाशयान (विमान), शरिरावरील शस्त्रक्रिया आदींचे शोध पाश्चात्त्य वैज्ञानिकांच्या पूर्वी शेकडो वर्षे आमच्या ऋषीमुनींनी लावले आहेत. त्यांनी विज्ञानाचा उपयोग मानवाच्या हितासाठी केला. मोहग्रस्त होऊन तात्कालिक सुखाच्या मागे धावण्याची शिकवण त्यांनी दिली नाही, तर सतत टिकणारा आनंद आणि मनःशांती यांचा शोध घेण्याची शिकवण त्यांनी दिली. यासाठी मुलांनो, दूरचित्रवाणी, इंटरनेट, व्हीडीओ गेम्स आदींचा उपभोग तात्कालिक सुख मिळवण्यासाठी करू नका; कारण त्यांच्या मोहजालात तुम्ही फसत जाल आणि जीवनातील बहुमूल्य वेळ अन् पैसाही गमवाल ! असे होऊ नये यासाठीच या ग्रंथात दूरचित्रवाणी, इंटरनेट, व्हीडीओ गेम्स आदींमुळे होणारे शारीरिक, मानसिक, राष्ट्रीय, सांस्कृतिक अशा विविध स्तरांवरचे तोटे सांगितले आहेत.

स्वामी विवेकानंद म्हणत, ‘जीवनात विज्ञान आणि धर्म यांची योग्य सांगड घालणे महत्त्वाचे आहे.’ खरा आनंद हा सुखाची साधने उपभोगण्याने मिळत नाही, तर धर्मपालनाने मिळतो. म्हणूनच धर्मपालन आणि धर्मकार्य करण्याच्या सद्हेतूने विज्ञानाचा उपयोग करून घेणे योग्य ठरते. यासाठीच या ग्रंथात दूरचित्रवाणी, मोबाईल व इंटरनेट यांचा वापर धर्म, तसेच राष्ट्र यांच्या कार्यासाठी कसा करावा, हे सांगितले आहे.

हा ग्रंथ वाचून दूरचित्रवाणी, इंटरनेट आदींचा उपयोग मुलांनी राष्ट्र आणि धर्म सेवा करण्यासाठी केला, तर या ग्रंथाचे सार्थक झाले, असे होईल. तसे करण्याची सद्बुद्धी मुलांना होवो, ही प्रार्थना ! – **संकलक**